3. Appointment to the post of " Assistant Commissioner of Fisheries (Administration)/Assistant Commissioner of Fisheries (Loan and Recovery)," in Maharashtra Fisheries Services, Group 'A' in the Commissionerate of Fisheries shall be made either :—

(*a*) by promotion of suitable person on the basis of seniority, subject to fitness from amongst the persons.

(*i*) holding the post of Maharashtra Service of Fisheries (Administration), Group-B (*Gazetted*) "Administrative Officer/Planning Officer/Budget Officer/Rcovery Officer " in the Commissionerate of Fisheries ;

(*ii*) having Minimum three years regular service on that post.

*OR*

(*b*) by transfer of a suitable person holding equivalent post from any Department of Government ;

4. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass examination in Hindi and Marathi Language according to the rules in that behalf, unless he has alrady passed, or has been exempted from passing these examinations.

5. A person appointed to the post mention in Rule 3 should pass a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information and Technology, Government of Maharashtra, from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIL DIGGIKAR,
Secretary(ADF),
Government of Maharashtra.

RNI No. MAHBIL/2009/31732
Reg. No. MH/MR/South-320/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग चार-अ

वर्ष ४, अंक १६] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ९-१५, २०१२/श्रावण १८-२४, शके १९३४ [पृष्ठे ३५
[ किंमत : रुपये ४.०० ]

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० एप्रिल २०१२

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मत्स्यआ. २००८/प्र.क्र. १९९/पदुम-१२.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि यापूर्वी या संबंधित अस्तित्वात ...सलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयातील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवा गट-अ मधील सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (प्रशासन)/सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (कर्ज व वसुली) या पदांच्या सेवाभरतीचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहेत :—

या नियमांना सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (प्रशासन)/सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (कर्ज व वसुली) गट-अ (सेवाप्रवेश), नियम २०१२ असे समजण्यात यावे.



Scanned by CamScanner

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " आयोग " म्हणजे " महाराष्ट्र लोकसेवा आयोग " ;

(ब) " अयुक्तालय " म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालय ;

(क) " विभाग " म्हणजे कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

३. आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालयातील मत्स्यसेवा गट-अ संवर्गातील " सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (प्रशासन)/सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (कर्ज व वसुली) " या पदावरील नेमणुका पुढील मार्गाने करण्यात येतील,—

(अ) पदोन्नतीने योग्य व्यक्तिंच्या ज्येष्ठताअधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने करण्यात येईल.

(*i*) आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयातील " महाराष्ट्र मत्स्यसेवा गट-ब (प्रशासकीय) (राजपत्रित) " या संवर्गातील " प्रशासकीय अधिकारी/नियोजन अधिकारी/अर्थसंकल्प अधिकारी/वसुली अधिकारी या पदावरील अधिकाऱ्यांमधून ;

(*ii*) गट-ब (प्रशसकीय) मधील पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांमधून.

**किंवा**

(ब) सदर पद शासनाच्या अन्य विभागातील समकक्ष पदावरील पात्र व्यक्तिंच्या बदलीने.

४. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त व्यक्ती यासंबंधात तयार केलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा यापूर्वी उत्तीर्ण केलेली नसल्यास वा त्या व्यक्तिस परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तिस, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीसंबंधीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अनिल डिग्गीकर,
शासनाचे सचिव (पदुम).



**AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT**

Mantralaya, Annexe, Mumbai 400 032, dated 30th April 2012

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Matsya. 2008/CR-199/ADF-12.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, and in force in the state the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Assistant Commissioner of Fisheries (Administration)/ Assistant Commissioner of Fisheries (Loan and Recovery), in Maharashtra Fisheries Services, Group 'A' in the Maharashtra Fisheries Service in the Commissionerate of Fisheries under the Agriculture, Animal Husbundry, Dairy Development and Fisheries Department of Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the " Assistant Commissioner of Fisheries (Administration)/Assistant Commissioner of Fisheries (Loan and Recovery)", in Maharashtra Fisheries Services, 'Group 'A' ' (Recruitment) Rules, 2012.

2. In these rules, unless the context requires otherwise ,—

(*a*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission.

(*b*) " Commissionerate " means the " Commissioner of Fisheries " under the " Agriculture, Animal Husbundry, Dairy Development and Fisheries Department " of Government of Maharashtra.

(*c*) " Department " means " the Agriculture, Animal Husbundry, Dairy Development and Fisheries Department."

Scanned by CamScanner